जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

## प्रेसनोट क्रमांक - ८६ दिनांक - ०१/०२/२०२४

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# आरमन नानावत (टोळी प्रमुख) व त्याचा ०१ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

दि.१८/०८/२०२३ रोजी फिर्यादी हे मथुरा हौसिंग सोसायटीचे जवळ हायफाय फॅशन कपड्याचे दुकाना शेजारी संघर्ष चौक चंदननगर पुणे येथुन रस्त्याने कपडे घेणेसाठी पायी चालत असताना,त्यांचे समोरुन मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमापैकी मागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसका मारुन तोडुन नेले म्हणुन फिर्यादी यांनी ०२ अनोळखी इसमांविरुध्द चंदननगर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने गु.रजि.नं. ३८९/२०२३ भा.द.वि कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान **१)अरमान प्रल्हाद नानावत,वय २२ वर्षे,रा.पोटफोडे वस्ती,सोनी गोडाऊन मागे,वढु-खुर्द,ता.हवेली,जि.पुणे (टोळी प्रमुख) २)ओंकार रामकिसन गायकवाड,वय २० वर्षे,रा.काका चव्हाण यांचेकडे भाड्याने,चाकण रोड,शिक्रापुर,पुणे (टोळी सदस्य) यांना दाखल गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आलेली आहे.**

नमुद आरोपी **आरमान प्रल्हाद नानावत (टोळी प्रमुख)** व त्याचा साथीदार याने संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन,त्याने बेकायदेशीर मार्गाने हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा दाखवुन किंवा जुलुम जबरदस्ती करुन किंवा अन्य अवैध मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालु ठेऊन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे संघटीत गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन,सदरचे गुन्हे हे अवैद्य मार्गाने स्वतःसाठी व इतरांसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्यासाठी, टोळीचे वर्चस्वासाठी व दहशत कायम ठेवण्यासाठी तसेच नागरीकांच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी सातत्याने चालु ठेवल्याचे निष्पन्न होत आहे. यातील नमुद आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी प्रस्तुत गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने सदर टोळीने मागील १० वर्षात जबरी चोरी करणे, फौजदारीपात्र कट रचने इत्यादी प्रकारचे गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे.व यापुर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

प्रस्तुत दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करणेकामी चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती.मनीषा पाटील यांनी पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,पुणे शहर,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.३८९/२०२३,भा.द.वि.कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,(अतिरिक्त कार्यभार) व मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.विजयकुमार मगर, मा.सहा. पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती.मनिषा पाटील, पोलीस उप निरीक्षक,संजय गायकवाड, पोलीस अंमलदार, राजेश नवले, रामचंद्र गुरव, सागर तारु, नाना पतुरे, गणेश आव्हाळे, अनुप सांगळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुद्ध व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देणेबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत.**त्यांचे मागदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ११६ वी कारवाई आहे.**